दिनांक . ३०/०९/२०१९

## -: प्रेसनोट प्रसिध्दी पत्रक :-

मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचेकडील निर्देशानुसार कोल्हापूर पोलीस दलामध्ये दिनांक ३१/१२/२०१९ अखेर रिक्त होणा-या एकूण ७८ पोलीस शिपाई व नमुद पदापैकी ०३ बॅन्डसमन पदांची भरती आयोजीत करण्यात येणार आहे. त्याकरीता उमेदवारांकडून दिनांक ०३/०९/२०१९ ते २३/०९/२०१९ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज हे www.mahapariksha.gov.in, या संकेतस्थळावर भरण्यात आलेले आहेत तसेच पोलीस भरती संदर्भातील माहिती ही www.mahapolice.gov.in **आणि या कार्यालयाच्या** www.kolhapurpolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याप्रमाणे पोलीस शिपाई भरतीचे आवेदनपत्र हे दिनांक २३/९/२०१९ अखेर पर्यंत ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे होते.

तथापी कोल्हापूर जिल्हयातील काही दैनिक वृतपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे की,काही पुरबाधीत भागातील उमेदवारांची शैक्षणिक कागदपत्रे ही पुरा मध्ये वाहुन गेली आहेत असे समजते. त्यानुसार पोलीस भरतीची प्रथम लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे व त्यानंतर शारीरीक चाचणी घेतले नंतर गुणवत्तेनुसार प्राप्त केलेल्या उमेदवारांचे पोलीस भरतीसाठी कागदपत्रांची छाननी शेवटच्या टप्प्यात केली जाणार आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांची मुळ कागदपत्रे नसल्यास ती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना पुरेसा अवधी उपलबध्द होणार आहे. तरी सदरची कागदपत्रे संबधित विभागाकडून मुळ स्वरुपात प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी .